# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०२/०८/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

### जबरी चोरी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १८ कि. मी. अंतरावरील गुमथळा ते पलसाड नामदेव राईस मिल मौजा पलसाड शिवार येथे दिनांक ०२/०८/२२ चे ०४.३० वा. ते ०४.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— विकास टिकाराम मडावी, वय २७ वर्ष, रा. उमरी ता. कामठी हा त्याच्या MH-40/CJ-4697 क्रमांकाच्या मोटरसायकलने उमरी वरुन प्लायवूड कंपनी पलसाड येथे जात होता. त्याने गुमथळा क्रास करुन सर्विस रोडने अंदाजे २ किमी अंतर पास करुन प्लायवूड कंपनीकडे जात असता अंदाजे ०४.४५ वा. फिर्यादीच्या मागून काळया रंगाची मोटरसायकल वर ३ अज्ञात आरोपी बसून आले. आरोपीतांनी नामदेव राईस मिल जवळ रोडवर फिर्यादीच्या मोटरसायकला कट मारली. फिर्यादी हे मोटरसायकल सह खाली पडले. आरोपीच्या मोटरसायकलवर मागे बसलेले दोन आरोपी हे गाडी वरुन उतरले त्यापैकी एकाची अंदाजे उंची ५ फूट ५ इंच होती व अंगात लाल रंगाचा शर्ट व काळसर रंगाचा पॅन्ट होता व दुस—या इसमाची उंची ५ फुट अंगात मोठया चौकडयाचा काळसर रंगाचा शर्ट व पॅन्ट चा रंग फिर्यादीचे लक्षात नाही. हे दोन्ही इसम फिर्यादी यांच्याकडे आले व मोटरसायकलची चाबी काढून घेतली. त्या दोन्ही इसमांनी फियादी यांना धकाबुक्की केली. तसेच आरोपीतांनी मोबाईल व पैसे मागितले एका इसमाने फिर्यादी यांच्या पॅन्टच्या खिशात हात घालून पॅन्ट मधून ६० रु व फिर्यादींची काळया रंगाची MH-40/CJ-4697 क्रमांकाच्या मोटरसायकल कि. ६०,०००/—रु. असा एकुण कि. ६०,०६०/—रु. चा मुद्देमाल जबरीने हिसावून घेवून गेले. त्या तिन्ही आरोपीचे वय अंदाजे २० ते २५ वयोगटातील आहे.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३९२, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक डोईफोडे मो.क्र. ९८२३३०१४७४ हे करीत आहे.

### चोरी

**१) पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा रिंगणबोडी येथे दिनांक ०५/०७/२०२२ चे १३.०० वा. ते दिनांक ०१/०८/२०२२ चे १२.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— रामशंकर विश्वनाथ शुक्ला, वय ६७ वर्ष, रा. लक्ष्मी नगर, सुरेंद्रनगर नागपुर यांचे रिंगणाबोडी शिवारातील असलेल्या शेतातील फार्म हाउसच्या दरवाज्याचे कुलुप अज्ञात आरोपीने तोडुन आतमध्ये प्रवेश केला. यानंतर आरोपीने रूममध्ये ठेवलेली ३ एच.पी. ची जुनी वापरती ईलेक्ट्रीक मोटार कि. २,०००/— रू. ची चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार बाबुलाल राठोड हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत सार्थ पब्लीक स्कुल येथे दिनांक ३०/०७/२०२२ चे १२.३० वा. दिनांक ३१/०७/२०२२ चे १८.०० वा. फिर्यादी नामे— भुशणराव यशवंतराव निंबाळकर, वय ५६ वर्ष, रा.गणेश नगर, कन्हान हे शाळेतील विद्यार्थांना खेळण्यारिता ठेवलेला लोखंडी झुला किं. अंदाजे ८,०००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार गणेश पाल मो.नं. ९५५२५१७२६८ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत ११ कि. मी. अंतरावरील मौजा फेटरी येथे दिनांक ०१/०८/२२ चे २२.०० ते दिनांक ०२/०८/२२ चे ०६.०० वा. पर्यत फिर्यादी नामे— किसना उदयभान खोब्रागडे, वय ७० वर्षे, रा. वार्ड क्र. ०३ पेट्रोलपंप जवळ फेटरी ता.जि. नागपुर यांचे बैल जोडी फेटरी शिवारातील शेतातील झोपडयात बांधुन होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे कि. १,००,०००/—रू. चे बैल जोड तसेच ०१ भुरकट रंगाचा कारोड कि. १२,०००/—रू. असा एकुण कि. १,१२,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार मन्नान नौरंगाबादे मो.नं. ९४२३६०४८२८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**